महत्वाचे

अ.शा.प.क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.७१०/३३

महाराष्ट्र शासन

संजय कुमार
मुख्य सचिव

सामान्य प्रशासन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- १८ जानेवारी, २०२१

**विषय :- राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा करण्याबाबत.**

संदर्भ :- सचिव, भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्र. 491/ECI/ FUNC/LET/SVEEP-1/NVD/2020/ दिनांक-६/०१/२०२१.

प्रिय श्री./श्रीम.

उपरोक्त विषयाबाबत भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त झालेल्या संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी "राष्ट्रीय मतदार दिवस" साजरा करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवीन तरूण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा प्रमुख उद्देश आहे.

राष्ट्रीय मतदार दिवशी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ सर्व मतदारांना दिली जाते. त्यानुसार आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयामध्ये सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम **दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी** आयोजित करण्यात यावा. राष्ट्रीय मतदार दिवशी इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेमध्ये घ्यावयाच्या शपथेचा नमुना सोबत जोडण्यात आला आहे. "कोविड" बाबत सर्व शासकीय सुचनांचे/आदेशांचे काटेकोर पालन करण्यात यावे.

आपला स्नेहांकित,

( संजय कुमार )

**अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व)**
**विभागीय आयुक्त (महसूल) (सर्व)**
**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)**

दूरध्वनी : कार्यालय ०२२-२२०२ ५० ४२/२२०२ ८७ ६२, फॅक्स : २२०२ ८५ १४, ई-मेल : cs@maharashtra.gov.in

Scanned with CamScanner

# तहसिल कार्यालय सांगोला

( निवडणूक शाखा )

दूरध्वनी क्र. ०२१८७-२२०२१८ ईमेल आयडी –tahsangola1@gmail.com

जा.क्र. निवडणूक / कावि/04 /२०२१ दिनांक – २१/०१/२०२१

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य

विज्ञान महाविद्यालय सांगोला

विषय – दिनांक २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दिनांक २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करावयाचा आहे. या वर्षीच्या कार्यक्रमासाठी मा. भारत निवडणूक आयोगाने **"Accessible Election"** , " सुलभ निवडणुका" हा विषय घोषित केला आहे. त्यास अनुसरून खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

**प्रत्येक शाळा स्तरावर मतदार दिनानिमित्त २५ जानेवारी पूर्वी विविध स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ९ वी ते १० वी (गट) व ११ वी च्या पुढील (गट) विद्यार्थ्यांचा समावेश असावा.**

अ) वक्तृत्व स्पर्धा

आ) निबंध स्पर्धा

इ) चित्रकला स्पर्धा

ई) रांगोळी स्पर्धा

वरील स्पर्धांचा मुख्य विषय हा निवडणूक/लोकशाही असा असावा. सदर स्पर्धा शाळा स्तरावर घेवून त्यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा फोटोसह अहवाल दिनांक २०/०१/२०१८ रोजी पूर्वी इकडील कार्यालयास सादर करावा. मा. भारत निवडणूक आयोग सदर फोटोची स्मरणीका प्रकाशित करणार आहेत तरी फोटो क्वालिटी चांगली असावी . दिनांक २५/०१/२०१८ रोजी मतदार दिनाचे औचीत्य साधून इकडील कार्यालयाकडून सदर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करणेचे असल्याने विहित मुदतीत सदर स्पर्धा घेवून पहिल्या तीन विद्यार्थ्यांच्या माहितीचा परिपूर्ण अहवाल सादर करावा. तसेच सदर कार्यक्रम घेत असताना **COVID-19** च्या अनुषंगाने योग्य ती खबरदारी घेण्यात यावी. मतदान जनजागृती तसेच व्यापक प्रमाणात प्रसिदधी होण्याच्या दृष्टीने नाविण्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. सदर दिवशी कॉलेजचे राज्यशास्त्र विषयाच्या प्राध्यापकाना मतदार दिनाविषयी भाषण देण्यास आमंत्रित करावे. सदर कार्यक्रमासाठी पोस्टर्स ,बॅनर्स या कार्यालयाकडून उपलब्ध करून देण्यात येतील. तरी आपण कार्यक्रमाचे नियोजन करून उक्त सर्व कार्यक्रमाचे फोटोसह अहवाल इकडील कार्यालयास विहित मुदतीत सादर करण्यात यावेत.

सहा. मतदार नोंदणी अधिकारी
२५३ सांगोला विधानसभा मतदार संघ तथा
तहसिलदार सांगोला

प्रत – १)मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी सो, सोलापूर याना माहितीस्तव सविनय सादर

२) मा. उपविभागीय अधिकारी मंगळवेढा उपविभाग मंगळवेढा याना माहितीस्तव सविनय सादर

२/- प्रत गट शिक्षण अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी

श्री वाकडे सर
पुढील कार्यवाहीसाठी
22.1.21

Scanned with CamScanner

सूचना

दि - २४/०१/२०२०

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी - विद्यार्थीनींना कळविण्यात येते की, "२५ - जानेवारी राष्ट्रीय मतदार" दिन साजरा केला जाणार आहे तरी वक्तृत्व स्पर्धा - व निबंध स्पर्धा यांचे आयोजन केले आहे तरी ज्या विद्यार्थ्यांना निबंध स्पर्धेमध्ये भाग घ्यावयाचा आहे अशा ~~विद्यार्थ्य~~ विद्यार्थ्यांनी खालील विषयावरील निबंध लिहुन 9404670816 (प्रा. अशोक वाळके) या नंबर वर दिनांक 25 जानेवारी 2021 पर्यंत पाठवावे.

* निबंध स्पर्धा विषय *

1. २५ जानेवारी - राष्ट्रीय मतदार दिन.
2. मतदान - ~~एक~~ पवित्रदान.
3. सदृढ्याची लोकशाही आपली मतदान.
4. EVm तारक की मारक.

*वक्तृत्व स्पर्धा :-

दि. २५ जानेवारी सकाळी १० ते ११ या वेळेमध्ये google meet द्वारे पार पडतील

विषय - "२५ जानेवारी राष्ट्रीय मतदान जनजागृती"

(टिप - प्रत्येक विद्यार्थ्यास 10 मिनिट वेळ दिला जाईल)

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# मतदान : एक पवित्र दान

"युवा शक्ती के तीन है काम,"
"शिक्षा, सेवा और मतदान।

जगात अवयवदान, नेत्रदान, रक्तदान अशी अनेक प्रकारची दाने चर्चेत असतात परंतु मतदान हे ही अशाच प्रकारचे एक पवित्र दान आहे. त्याचबरोबर ते प्रत्येक व्यक्तीचा हक्क व कर्तव्य आहे. याविषयीच जागरूकता निर्माण करण्यासाठी व मतदान हे पवित्र दान उत्स्फूर्तपणे करण्यासाठी लोकांना प्रेरणा देण्यासाठी 25 जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो.

भारत हा एक लोकशाही देश आहे जिथे लोकांचे शासन चालते. ही लोकशाही अशी प्रक्रिया आहे जिथे लोक आपले प्रतिनिधी स्वत: निवडून देतात व त्यांच्यामार्फत आपले शासन चालवतात. प्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान हे एकमात्र असे साधन आहे ज्याद्वारे लोक स्वत: देशाचा विकास करण्यासाठी सहभागी होतात.

देशात लोकशाही टिकवून देशाचा विकास करण्यात मतदानाचे असाधारण महत्त्व आहे. म्हणूनच केंद्रसरकारने प्रत्येक 18 वर्षावरील भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने देखील ते आपले एक कर्तव्य मानून मतदान केले पाहिजे. व देशाच्या विकासात सहभागी झाले पाहिजे.

नवे वारे... नवी दिशा,
मतदानच आहे- उद्याची आशा...

Scanned with CamScanner

सर्वांची आहे ही जबाबदारी,
मत देणार सर्व नरनारी....

आजही अनेक देशामध्ये लोकशाही अस्तित्वात नाही. काही देशांमध्ये एकाच पक्षाचे वर्चस्व दिसून येते. लोकांना मतदान करताना अनेक अडचणींचा, दबावांचा सामना करावा लागतो. परंतु सुदैवाने भारतात लोकशाही निर्भयपणे नांदताना दिसते. प्रत्येकाला स्वतःच्या मर्जीने मतदान करण्याचा अधिकार मिळाला आहे. प्रत्येकाने या संधीचे सोने केले पाहिजे. काही देशांमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार खूप उशीराने मिळाला परंतु भारताच्या बाबतीत कोणताही भेदभाव न करता देश स्वतंत्र झाल्यापासून सर्व 18 वर्षावरील स्त्री-पुरूषांना मतदानाचा अधिकार मिळाला हे खरेतर कौतुकास्पद तितकेच अभिमानास्पद आहे.

आपल्या देशात लोकशाहीस इतके पूरक वातावरण असताना देखील 100% मतदान

K.GOLD

Scanned by TapScanner

Page:
Date: / /

होताना दिसत नाही, यावर प्रत्येकाने विचार करणे गरजेचे आहे. मतदानाचे महत्त्व प्रत्येकाने जाणले पाहिजे. व लोकशाही विकासात आपला सहभागाला नोंदविले पाहिजे. शेवटी सर्वांनी इतकेच आवाहन केले पाहिजे की, –

चला मतदान करू या...
लोकशाही रुजवूया
या देशाचा लौकिक वाढवूया,
तिरंगा झेंडा मानाने फडकवूया...

काशिद पूजा बंडू
BA-III (Economics)

Scanned with CamScanner

# राष्ट्रीय मतदार दिवस

"लोकशाहीने आहे दिले,
मतदानाचे शस्त्र हाती,
करावे त्याद्वारे लोकशाहीस प्रबळ,
करू नये त्याची माती !"

वरील चार ओळींतून 'मतदान' या शस्त्राचे महत्त्व आपल्याला चटकन कळून पटकन समजून, झटकन झटका देवून जाते. कारण हे लोकशाहीच्या हितसंवर्धनासाठी शस्त्राचे काम करते, याची कल्पना सुद्धा आपणा ला नसते.

15 ऑगस्ट 1947 रोजी आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले. पण लोकशाही पर्वाला सुरुवात मात्र 26 जानेवारीपासून झाली. आपला देश सार्वभौम बनला, गणराज्य बनला, आणि महत्त्वाचे म्हणजे लोकशाही पर्व सुरु झाले!

भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना 25 जानेवारी 1950 रोजी झाली आहे, म्हणूनच '25 जानेवारी' हा दिवस 'राष्ट्रीय मतदार दिन' म्हणून 2011 या सालापासून साजरा करण्यात येतो. 'भारतीय निवडणूक आयोग' ही भारतीय संविधानाद्वारे स्थापित केलेले एक स्वायत्त प्राधिकरण आहे. तसेच हे देशातील लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी जबाबदार असते.

खरतर, पूर्वी मतदाराचे पात्रता वय 21 वर्षे होते परंतु 1988 मध्ये ते कमी करून 18 वर्षे करण्यात आले. याचा अर्थ 18 वर्षे वयानंतर आपण या देशाचे एक सुज्ञ नागरिक होतो. तेव्हा हे मतदानाचे शस्त्र वापरायचे की

तेव्हा या 'राष्ट्रीय मतदार दिनाचे' मुख्य उद्देश्य मतदानाविषयी, लोकशाहीविषयी जागरूकता निर्माण करणे, हे आहे. तेव्हा संविधानकर्त्यांनी दिलेल्या या अधिकाराची जाणीव प्रत्येकाला असली पाहिजे. अन् महत्त्वाचे म्हणजे लोकशाहीला प्रबळ करण्यासाठी तसेच लोकशाहीला टिकवण्यासाठी, जोपासण्यासाठी, तिचे संवर्धन संवर्धन करण्यासाठी मतदान करून देशाचे किंबहुना स्वतःचे हित करण्याची जबाबदारी मतदाराने स्वीकारली पाहिजे. अन्यथा आपण जात, धर्म, वंश यांच्यात अडकलो, स्वतःचे नागरिक म्हणून असलेले कर्तव्य विसरलो तसेच माझ्या एकाने काय फरक पडणार ? यांचाच जर विचार करत बसलो तर देश लोकशाहीप्रधान राहील काय ? हा चिंतेचा विषय ठरतो !

म्हणूनच देशाचे सुज्ञ, जबाबदार नागरिक या नात्याने मतदान करून लोकशाहीचे इंधन होवू न देता चंदन करावे !

— दिपाली नाथा आडेकर
(बी. ए. 3)

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

# आम्ही आहोत....




# राष्ट्रीय मतदार दिवस

## २५ जानेवारी २०२१

**बलशाली लोकशाहीकरीता निवडणूक साक्षरता**

**Electoral Literacy for Stronger Democracy**

**जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सोलापूर**

Scanned with CamScanner

# राष्ट्रीय मतदार दिवस
# मतदारांसाठी प्रतिज्ञा

## मराठी

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू."

## हिंदी

"हम, भारत के नागरिक, लोकतंत्र मे. अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते हैं की हम अपने देश की लोकतांत्रिक परम्पराओंकी मर्यादा को बनाए रखेंगे तथा स्वतंत्र, निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए, निर्भीक होकर, धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा अथवा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना सभी निर्वाचनो में अपने मताधिकार का प्रयोग करेंगे."

## English

" We, the citizens of India, having abiding faith in democracy, hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free, fair and peaceful elections, and to vote in every election fearlessly and without being influenced by considerations of religion, race, caste, language or any inducement."

**********************

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

# २५ जानेवारी – राष्ट्रीय मतदार दिन.

## अहवाल.

विज्ञान महाविद्यालय, सांगोला येथे २५ जानेवारी – राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त २४ जानेवारी रोजी निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आले होते. लोकशाही सदृढ करण्यासाठी, व मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध मार्गाने प्रयत्न केले जातात. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी "मतदान – एक पवित्र दान" या विषयावर त्यांचे मते चांगल्याप्रकारे अजमावले. त्यामध्ये निबंधस्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. दिपाली खांडेकर, द्वितीय क्रमांक अक्षय उकरे, तृतीय क्रमांक पूजा कारीद यांनी पटकावला. वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अभिराज अनुसे, द्वितीय क्रमांक काजल दबडे तृतीय क्रमांक योगेश देशमुख पटकावला. त्याचबरोबर मतदान जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयमध्ये प्राध्यापक वर्ग व कर्मचारीवर्गांनी मतदान जनजागृती शपथ देण्यात आली. सदर कार्यक्रमाची शपथ प्राचार्य डॉ. सोहेबराव जुंधळे यांनी दिली. राष्ट्रीय मतदार दिनाची थोडक्यात माहिती प्रा. अशोक वाकडे यांनी दिली. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. मनोहर वाघमोडे यांनी केले.

Vidnyan Mahavidyalaya, Sangola
Sangola 413307
Dist. Solapur

Scanned with CamScanner

# …ात कोरोना …र जनजागृती …हात संपन्न

…क्षीय अधिकारी म्हणून …क.व्ही.मुळीक यांनी काम …ले. तसेच आरोग्य …कारी श्री मिलींद स्वामी, …ा वर्कर श्रीम. अलका …लावे, ग्रामसेवक श्री. …र शिंदे, श्री. आगलावे …श्री. डॉ. सूर्यकांत …ठकर, आगलावेवाडी …ूल मधील सर्व शाळांचे …ाध्यापक, उपशिक्षक, …गवाडी सेविका, मदतनीस …पस्थित होते. सदर …तफेरी यशस्वी …यासाठी परिश्रम घेतले.

# विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शपथ कार्यक्रम संपन्न

सांगोला(प्रतिनिधी):- २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विज्ञान महाविद्यालयामध्ये निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर कार्यक्रम ऑनलाईन घेतले. लोकशाही सदृढ व निकोप करण्यासाठी मुलांनी मोठ्या प्रमाणात त्यांच्या निबंधातून व वक्तृत्वातून आपआपल्या मतांची छाप टाकली.

निबंध स्पर्धेमध्ये दिपाली खांडेकर हिने प्रथम क्रमांक, अक्षय उत्तरे यांने व्दितीय क्रमांक तर पुजा काशिद हिने तृतीय क्रमांक क्रमांक पटकाविला.वक्तृत्व स्पर्धेमध्ये अविराज अनुसे यांने प्रथम क्रमांक, काजल दबडे हिने व्दितीय क्रमांक

## मराठी विभागाच्यावतीने निबंध स्पर्धा संपन्न

तर योगेश देशमुख याने तृतीय क्रमांक पटकाविला.

महाविद्यालयातील मराठी विभागाच्यावतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मराठी भाषा आणि आपण, मराठी भाषा आव्हाने आणि उपाय व मराठी भाषा काळाची गरज या विषयावर निबंध स्पर्धा आयोजीत केली होती. या निबंध स्पर्धेत खांडेकर दिपाली नाथा हिने प्रथम क्रमांक, रणदिवे अनुराधा अनिल हिने व्दितीय क्रमांक तर गावडे दिपाली आबासाहेब हिने तृतीय क्रमांक पटकाविला. निबंध स्पर्धा आयोजित करुन मराठी भाषेची अभिरुची वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय मतदार जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयमध्ये मतदान जगजागृती शपथ देण्यात आली. हि शपथ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.साहेबराव जुंदळे यांनी देताना महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थ्यांना संबोधीत केले. यामध्ये मतदारांनी लोकशाही सदृढ करण्यासाठी मतदानाचा हक्क वाढविला पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक अशोक वाकडे यांनी तर आभार प्रा.डॉ.मनोहर वाघमोडे यांनी मानले.

# …ह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये राष्ट्रीय …दान जागृती दिन उत्साहात साजरा






Scanned with CamScanner

दैनिक सांगोला नगरी

# भारतीय संविधान म्हणजे मानवीय मूल्यांचा जाहीरनामा : प्रा. धैर्यशील भंडारे



सांगोला/प्रतिनिधी:

आज भारताचा ७१ वा संविधान दिन संपूर्ण देशामध्ये अतिशय उत्साहात साजरा करण्यात येत आहे. आजच्या दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने भारतीय जनतेला निर्मितीचे उत्तरदायित्व मानून संविधान स्वतःप्रत अर्पण केले आहे. असे असले तरी काही मूलतत्त्ववादी समाजघटक आजही संविधानाला मान्यता द्यायला तयार नाहीत. हा उत्साहाचा दिवस केवळ उत्सव न राहता त्यातून व्यापक समाजमनापर्यंत प्रसार झाल्यास, व्यवहारात उतरविल्यास खऱ्या अर्थाने साजरा होणार आहे. याचे औचित्य केवळ विशिष्ट समूह, संसद, सरकारी कार्यालये न राहता सार्वजनिक व्यवहार बनावा असे विचार राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. धैर्यशील भंडारे यांनी व्यक्त केले. विज्ञान महाविद्यालय सांगोला आयोजित संविधान दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय संविधान आणि लोकव्यवहार या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. [illegible] होते.

पुढे बोलत असताना प्रा. धैर्यशील भंडारे म्हणाले, संविधानपूर्वीकाळामध्ये अनेक भारतातील केवळ अन्य समुदायास राजकारणात, सार्वजनिक जीवनात प्रवेश करण्याची संधी होती मात्र संविधानपूर्वीकालीन पश्चात बहुसंख्य लोकांना हे अधिकार प्राप्त झाले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या न्यायतत्त्वावर आधारलेले हे भारतीय संविधान म्हणजे मानवीय मूल्यांचा जाहीरनामा आहे असे ते म्हणाले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. संभाजीराव शिंदे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन करीत असताना आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले, आपले संविधान हे जगात सर्वोत्तम असून त्यामुळे जनजीवन शिस्तबद्ध झाले आहे. संविधानामुळे प्रत्येक समाजघटकाला विकासाची संधी व हमी प्राप्त झाली आहे. त्यामुळे प्रत्येकाने संवैधानिक नीतिमूल्ये जपली पाहिजेत असे ते म्हणाले. यावेळी प्रा. डॉ. तानाजी फुलारी, बाबासाहेब कोळी, नितीन कुलकर्णी, श्रीम. विमल माने, राजू वाघमारे, [illegible], प्रकाश जोगळे आदी प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन नियोजन समितीचे चेअरमन प्रा. डॉ. दिपक शिंदे यांनी केले. सदर कार्यक्रम [illegible] नियमांचे पालन करून साजरा करण्यात आला.

Scanned by CamScanner

## संविधान दिन साजरा करताना निसार मुलाणी सदीगले राजू प्रकाश जगले   रिटे सर



शुक्रवार, दि.२७ नोव्हेंबर २०२०

स्वाभिमानी छावा

# भारतीय संविधान म्हणजे मानवीय मूल्यांचा जाहीरनामा : प्रा. धैर्यशील भंडारे

सांगोला.- आज भारताचा ७१ वा संविधान दिन संपूर्ण देशामध्ये अतिशय उत्साहात साजरा करण्यात येत आहे. आजच्या दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने भारतीय जनतेला निर्मितीचे उगमस्थान मानून संविधान स्वतःप्रत अर्पण केले आहे. असे असले तरी काही मूलतत्त्ववादी समाजघटक आजही संविधानास मान्यता द्यायला तयार नाहीत. हा उत्साहाचा दिवस केवळ उत्साह न राहता त्याला व्यापक समाजमान्यता प्राप्त झाल्यास, व्यवहारात उतरविल्यास राष्ट्रहित साधले जाणार आहे. याचे औचित्य केवळ विशिष्ट समूह, संस्था, सरकारी कार्यालये न राहता सार्वजनिक व्यवहार बनावा असे विचार राजकीय विश्लेषक प्रा. धैर्यशील भंडारे यांनी व्यक्त केले. विज्ञान महाविद्यालय सांगोला आयोजित संविधान दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय संविधान आणि लोकव्यवहार या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. साहेबराव जुंदळे होते.

पुढे बोलत असताना प्रा. धैर्यशील भंडारे म्हणाले, संविधानस्वीकृतीच्या अगोदर भारतातील केवळ अल्प समुदायास राजकारणात, सार्वजनिक जीवनात प्रवेश करण्याची संधी होती मात्र



संविधानस्वीकृतीच्या पश्चात बहुसंख्य लोकांना तो अधिकार प्राप्त झाला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या न्यायावर आधारलेले हे भारतीय संविधान म्हणजे मानवीय मूल्यांचा जाहीरनामा आहे असे ते म्हणाले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. संभाजीराव शिंदे यांनी प्रास्ताविक व सुत्रसंचालन करीत असताना आपले मनोगत व्यक्त केले. ओघवत्या शैलीत ते म्हणाले, आपले संविधान हे जगात सर्वोत्तम असून त्यामुळे जनजीवन शिस्तबद्ध झाले आहे. संविधानामुळे प्रत्येक समाजघटकास विकासाची संधी व हमी प्राप्त झाली आहे. त्यामुळे प्रत्येकाने संवैधानिक नीतिमूल्ये जपली पाहिजेत असे ते म्हणाले. यावेळी प्रा. डॉ. तानाजी फुलारी, बाळासाहेब कोळी, निसार मुलाणी, श्रीम. विमल माने, राजू सादिगले, वसंत घुसाळे, प्रकाश जांगळे आदी प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन नियोजन समितीचे चेअरमन प्रा. डॉ. दिपक रिटे यांनी केले. सदर कार्यक्रम फिजिकल डिस्टनसिंगच्या नियमांचे पालन करून साजरा करण्यात आला.

Scanned by CamScanner

# भारतीय संविधान म्हणजे मानवीय मूल्यांचा जाहीरनामा–प्रा.भंडारे

सांगोला (प्रतिनिधी):- आज भारताचा ७१ वा संविधान दिन संपूर्ण देशामध्ये अतिशय उत्साहात साजरा करण्यात येत आहे. आजच्या दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने भारतीय जनतेला निर्मितीचे उगमस्थान मानून संविधान स्वत:प्रत अर्पण केले आहे. असे असले तरी काही मूलतत्त्ववादी समाजघटक आजही संविधानास मान्यता द्यायला तयार नाहीत. उत्साहाचा दिवस केवळ उ... राहता त्याला व्यापक समाजमान्यता प्राप्त झाल्यास, व्यवहारात उतरविल्यास राष्ट्रहित साधले जाणार आहे. याचे औचित्य केवळ विशिष्ट समूह, संस्था, सरकारी कार्यालये न राहता सार्वजनिक व्यवहार बनावा असे विचार राजकीय विश्लेषक प्रा. धैर्यशील भंडारे यांनी व्यक्त केले.




विज्ञान महाविद्यालय सांगोला आयोजित संविधान दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय संविधान आणि लोकव्यवहार या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. साहेबराव जुंदळे होते.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. संभाजीराव शिंदे यांनी प्रास्ताविक व सुत्रसंचालन करीत असताना आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. डॉ. तानाजी फुलारी, बाळासाहेब कोळी, निसार मुलाणी, श्रीम. विमल माने, राजू सादिगले, वसंत घुसाळे, प्रकाश जांगळे आदी प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार... नियोजन समितीचे चेअरम... ...क रिटे यांनी केले.

## श्रीनगर येथे दहशतवादी

Scanned by CamScanner



Scanned by CamScanner



Scanned by CamScanner



Scanned by CamScanner



Scanned by CamScanner



Scanned by CamScanner



Scanned by CamScanner

# विज्ञान महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**सांगोला/प्रतिनिधी :**

विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९१ व्या जयंत्तीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. साहेबराव जुंदळे व प्रा. दिपक रिटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. साहेबराव जुंदळे होते. यावेळी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करीत असताना ते म्हणाले की, अंधश्रध्दा आणि अज्ञानामध्ये असलेल्या समाजाला ज्ञानाचा प्रकाश दाखवण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी केले हे सामाजिक काम करीत असताना अनेक अडथळे निर्माण करण्यात आले पण त्याला न डगमगता न थकता त्या लढत



राहिल्या. सावित्रीबाई शिक्षित नव्हत्या परंतु संपूर्ण देशातील पहिल्या स्त्री शिक्षक म्हणून त्यांनी गौरव प्राप्त केला. मुलींची अवस्था अत्यंत दयनीय होती. त्यांना वाचन लेखन करण्यासाठी परवानगी नव्हती. ही पध्दत मोडण्यासाठी ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी १८४८ मध्ये मुलींची शाळा सुरु केली. दलित, शोषित, पिडितांच्या मुलांना गावोगावी शिक्षण मिळू लागले. आज जे आपण शिक्षण घेत आहोत ते त्यांच्या विचारातूनच तेव्हा विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचे विचार प्रेरणास्थानी मानून जगले पाहिजे. असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. दिपक रिटे यांनी केले तर आभार प्रा. आबासाहेब इंगोले यांनी मानले. सदर कार्यक्रम फिजीकल डिस्टिनसिंगच्या नियमांचे पालन करून साजरा करण्यात आला.

Scanned by CamScanner

# विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन



सांगोला/प्रतिनिधी :

विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९१व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. साहेबराव जुंधळे व प्रा. दीपक रिटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. साहेबराव जुंधळे होते.

यावेळी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करीत असताना ते म्हणाले की, अंधश्रद्धा आणि अज्ञानामुळे असलेल्या समाजात ज्ञानाचा प्रकाश दाखवण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी केले. हे सामाजिक कार्य करत असताना अनेक अडथळे निर्माण करण्यात आले. पण त्याला न डगमगता त्या लढत राहिल्या. सावित्रीबाई शिक्षित न्हवत्या परंतु संपूर्ण देशातील पहिल्या स्त्री शिक्षक म्हणून त्यांनी गौरव प्राप्त केला. मुलींची अवस्था अत्यंत दयनीय होती. त्यांना वाचन-लेखन करण्यासाठी परवानगी नव्हती. ही पद्धत मोडण्यासाठी ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी १८४८ मध्ये मुलींची शाळा सुरू केली. दलित, शोषित, पीडितांच्या मुलांना गावोगावी शिक्षण मिळ[illegible] लागले. आज [illegible] आपण शिक्षण घे[illegible] आहोत ते त्यांच्या विचारातूनच [illegible] विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचे विचार [illegible] म्हणून जगले पाहिजे [illegible] आशावाद त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. दिपक रिटे यांनी केले. तर आभार प्रा. आबासाहेब इंगोले यांनी मानले. सदर कार्यक्रम फिजिकल डिस्टन्सिंगच्या नियमांचे पालन करून [illegible] करण्यात आला.

सावित्रीबाई फुले यांची १९१ वी जयंती साजरी करताना प्राचार्य साहेबराव judale प्रा दीपक रिते प्रा इंगोले आबासाहेब व एन सी सी विद्यार्थी

Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner

चौक, सांगोला।

# विज्ञान महाविद्यालय येथे सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन

सांगोला (प्रतिनिधी):- विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ साहेबराव ढुंदळे, प्रा.आबासाहेब इंगवले, प्रा.रावसाहेब गडहिरे, प्रा.मारुती हाके व प्रमुख पाहुणे प्रा.हनुमंत कोळवले यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा दीपक रिटे म्हणाले की सावित्रीबाई फुले यांचे विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवून समाज जागृतीचे काम केले पाहिजे. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य हे निश्चितच येणाऱ्या पिढीसाठी प्रेरक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा.हनुमंत कोळवले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्राचा थोडक्यात आढावा घेऊन सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण विषयक विचार थोडक्यात स्पष्ट केले.

सूत्रसंचालन प्रा आबासाहेब इंगवले यांनी केले तर आभार प्रा.रावसाहेब गडहिरे यांनी मांडले. कार्यक्रमाला उपस्थित प्रा.व्ही.एम.पवार, प्रा.मारुती हाके, शिंदे स्वप्नील, श्यामराव ठोंबरे, भजनावळे काका, विमलताई माने, नियोजित समितीचे चेअरमन व सदस्य विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने होते. कार्यक्रम सोशल डिस्टंसिंग ठेवून पार पाडण्यात आला.

श्रीराम मोटार ड्रायव्हिंग

Scanned by CamScanner

# विज्ञान महाविद्यालय येथे सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन



[illegible]

## कृषी अधिकारी

## चुल आणि मुलं एवढ्या पुरतेच महिलांनी

पान १ वरून...

Scanned by CamScanner

# विज्ञान महाविद्यालय येथे सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन



Scanned by CamScanner

दैनिक
सांगोला सुपरफास्ट
गुरुवार दि. ११ मार्च २०२१

# विज्ञान महाविद्यालय येथे सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन

सांगोला/प्रतिनिधी :

विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साहेबराव जुंदळे, ज्येष्ठ प्रा. आबासाहेब इंगवले, प्रा. रावसाहेब महाहिरे, प्रा. मारुती हाके व प्रमुख पाहुणे प्रा हनुमंत कोळवले यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.



यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. दीपक शिंदे म्हणाले की, सावित्रीबाई फुले यांचे विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवून समाज जागृतीचे काम केले पाहिजे सावित्रीबाई फुले या खऱ्या अर्थाने शिक्षिका होत्या. त्यांनी तत्कालीन समाजाचा रोष पत्करून शिक्षणाचे पवित्र कार्य सुरू ठेवले फुले दाम्पत्य त्यांनी केलेले कार्य हे समाजाला मार्गदर्शक व प्रेरक ठरणारे असे आहे. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य हे निश्चितच येणाऱ्या पिढीसाठी प्रेरक आहे. त्यांनी स्त्री उद्धारासाठी स्त्री शिक्षणासाठी प्रसारासाठी केलेले प्रयत्न हे स्त्री जीवनाच्या वाटचालीमध्ये अत्यंत महत्त्वाचे आहेत. तेव्हा सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी करणे म्हणजे त्यांच्या विचाराचे त्यांच्या तत्त्वांचे त्यांच्या आचरणाचे स्मरण करणे होय. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांचे विचार आत्मसात करून आपल्या जीवनाचा आदर्शवाद स्वीकारला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने सावित्रीबाईंच्या विचाराला आपण अभिवादन करू.

प्रा. हनुमंत कोळवले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्राचा थोडक्यात आढावा घेऊन सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण विषयक विचार थोडक्यात स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आबासाहेब इंगवले यांनी केले तर आभार प्रा. रावसाहेब महाहिरे यांनी मांडले कार्यक्रमाला उपस्थित प्रा. व्ही. एस. पवार प्रा. मारुती हाके, शिंदे स्वप्नील, श्यामराव ठोंबरे, भजनावळे काका, शिवलाल माने, नियोजित समितीचे चेअरमन व सदस्य विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने होते कार्यक्रम सोशल डिस्टंसिंग ठेवून पार पाडण्यात आला.

Scanned by CamScanner

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी
विज्ञान महाविद्यालय मध्ये सादर करताना
प्रमुख पाहुणे प्रा कोळवले एचडी प्रा पवार
पीएम प्रा हाके एम ए धनंजय गायकवाड
आबासाहेब इंगवले गावडे एल टी सौ
विमलताई माने नियोजित समितीचे चेअरमन
प्रा दीपक रिटे इत्यादी




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner

# विज्ञान महाविद्यालयात नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती साजरी



**सांगोला/प्रतिनिधी:**

सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रेसर नेते [illegible] नेताजी [illegible] नावाने ओळखले जात होते. दुसरे महायुद्ध [illegible] इंग्रजांशी लढण्यासाठी त्यांनी जपानच्या [illegible] आझाद हिंद सेना स्थापन केली होती त्यांनी दिलेला जय हिंद [illegible] चा राष्ट्रीय नारा बनला अशा महान मानवाच्या [illegible] असलेले नेतृत्व संघटन कौशल्य राष्ट्रप्रेम त्यागी वृत्ती देशसेवा [illegible] हे गुण विद्यार्थ्यांनी अंगीकारले पाहिजेत असे विचार विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती साजरी करताना प्रा.दीपक रिटे यांनी विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. साहेबराव जुंदळे होते.

सुभाष चंद्र बोस यांच्या विविध पैलूंचे स्पष्टीकरण करताना प्रा.दीपक रिटे म्हणाले की, परदेशातून परतल्यानंतर रविंद्रनाथ टागोर यांच्या सल्ल्यानुसार मुंबईला जाऊन महात्मा गांधी यांना भेटले. २० जुलै २०२० रोजी महात्मा गांधी व सुभाष चंद्र बोस यांच्यामध्ये झालेली भेट स्वातंत्र्यलढ्याच्या दृष्टीने महत्त्वाची होती. याच काळात महात्मा गांधींनी इंग्रज सरकारच्या विरोधात असहकार आंदोलन चालले होते. त्यात सुभाषचंद्र नेताजी म्हणून नेतृत्व करीत होते. १९२२ ला काँग्रेस अंतर्गत स्वराज्य पक्षाची स्थापना करून इंग्रज सरकारला कडाडून विरोध केला. पंडित नेहरूंच्या मदतीने सुभाषबाबूंनी इंडियन सिलिंग ची स्थापना केली. १९२८ ला सायमन कमिशनला काळे झेंडे दाखवण्याचे नेतृत्व सुभाषबाबूंनी केले. तरुणांना स्वातंत्र्याने प्रेरित करण्यासाठी 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूंगा' या घोषणेने स्वातंत्र्यसेनानी बनण्याचा प्रयत्न केला. १९२८ ला काँग्रेसच्या अधिवेशनात महात्मा गांधी पूर्ण स्वराज्याच्या भूमिकेशी सहमत नव्हते. मात्र सुभाषबाबू व पंडित जवाहरलाल नेहरूंनी पूर्ण स्वराज्याची केलेली मागणी इंग्रज सरकारने मान्य केली नाही. २६ जानेवारी १९३१ च्या दिवशी कोलकत्यात सुभाषबाबू तिरंगा ध्वज फडकावत त्याचे नेतृत्व करीत होते. त्यांच्या सार्वजनिक जीवनात त्यांना अकरा वेळा कारावासही भोगावा लागला. तर नजरकैदेतून पलायन करीत असताना मौलवी वेशभूषा परिधान करावे लागले. त्यानंतर सुभाष चंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली व त्याचे नेतृत्वही केले. अशा या महान राष्ट्रपुरुष यांच्या विचाराचे आचाराचे स्मरण व्हावे यासाठी आज त्यांचा जन्मदिवस जयंती म्हणून साजरा करीत आहोत असे मत प्रा.रिटे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक संभाजीराव शिंदे यांनी केले तर आभार प्राध्यापक गडहिरे आरटी यांनी मांडले कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रम सोशल डिस्टंसिंग ठेवून पार पाडण्यात आला.

नेताजी सुभाष चंद्र बोस यांची 125 वी जयंती साजरी करताना प्रमुख पाहुणे दीपक रिटे प्राध्यापक आबासाहेब इंगवले प्राध्यापक गडहिरे रावसाहेब पवार भगवान दशरथ रणदिवे भजनावळे काका व विमल माने इत्यादी

Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner

# विज्ञान महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांना विनम्र अभिवादन



सांगोला/प्रतिनिधी :

विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस [illegible] रोहित हेगडे उपप्राचार्य संभाजीराव शिंदे, प्रा. दीपक रिटे यांच्या हस्ते [illegible] करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

विज्ञान महाविद्यालय येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य संभाजी राजे शिंदे रोहित हेगडे चंद्रकांत पवार पुविलास सखुळे दशरथ रणदिवे समितीचे दीपक रिटे इत्यादी

महाविद्यालयाचे उपप्राचार्य संभाजीराव शिंदे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे कार्य व जीवन चरित्र स्पष्ट करून स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिभा व त्यांची असलेली जिद्द याविषयी मार्गदर्शन केले. प्रा. दीपक रिटे मार्गदर्शन करताना म्हनाले की देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी सशस्त्र क्रांती करण्याची शपथ घेतली आणि ती स्वातंत्र्यवीर सावरकरांनी शेवटपर्यंत पाळली तारुण्य संसार घरदार आयुष्य याची देशासाठी राख रांगोळी करणारा वीर सावरकर हा एक दृष्टा युगपुरुष होता. इंग्रजी शासनाने काळ्यापाण्याची शिक्षा ठेठावली असतानाही त्या कोठडीत ही त्यांनी आपली प्रतिभा जिवंत ठेवली. आणि सहस्त्रावधी पानांचे वांग्मय लिहिणारा युगपुरुष क्रांतिकारक म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर यांना ओळखले जाते. स्वातंत्र्यवीर सावरकर उत्कट देशभक्त जहाल क्रांतिकारक एक इतिहासकार प्रभावी वक्ता क्रियाशील सुधारक होते. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांनी मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी शपथ घेतली. तेव्हा अशा या युगपुरुष आला विनम्र अभिवादन यावेळी रोहित हेगडे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची सखोल माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीपक रिटे यांनी केले. तर आभार गाडे सर यांनी मानले. कार्यक्रमाला उपस्थित दशरथ रणदिवे, चंद्रकांत पवार, व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम सोशल डिस्टंसिंग ठेवून पार पाडण्यात आला.

Scanned by CamScanner

# विज्ञान महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांना विनम्र अभिवादन




सांगोला:

विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुणे रोहित हेगडे उपप्राचार्य संभाजीराव शिंदे चेअरमन दीपक रिटे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य संभाजीराव शिंदे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे कार्य व जीवन चरित्र स्पष्ट करून स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिभा व त्यांची असलेली जिद्द याविषयी मार्गदर्शन केले प्रा दीपक रिटे मार्गदर्शन करताना म्हणतात की देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी सशस्त्र क्रांती करण्याची शपथ घेतली आणि ती स्वातंत्र्यवीर सावरकरांनी शेवटपर्यंत पाळली तारुण्य संसार घरदार आयुष्य याची देशासाठी राख रांगोळी करणारा वीर सावरकर हा एक द्रष्टा युगपुरुष होता इंग्रजी शासनाने काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावली असतानाही त्या कोठडीत ही त्यांनी आपली प्रतिभा जिवंत ठेवली आणि सहस्रावधी पानांचे वांग्मय लिहिणारा युगपुरुष क्रांतिकारक म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर यांना ओळखले जाते स्वातंत्र्यवीर सावरकर उत्कट देशभक्त जहाल क्रांतिकारक एक इतिहासकार प्रभावी वक्ता क्रियाशील सुधारक होते वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांनी मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी शपथ घेतली तेव्हा अशा या युगपुरुष आला विनम्र अभिवादन यावेळी रोहित हेगडे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची सखोल माहिती सांगितल

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा दीपक रिटे यांनी केले तर आभार गाडे सर यांनी मानले कार्यक्रमाला उपस्थित दशरथ रणदिवे चंद्रकांत पवार व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रम सोशल डिस्टंसिंग ठेवून पार पाडण्यात आला.

Scanned by CamScanner

विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुणे रोहित हेगडे उपप्राचार्य संभाजीराव शिंदे चेअरमन दीपक रिटे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले

महाविद्यालयाचे उपप्राचार्य संभाजीराव शिंदे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे कार्य व जीवन चरित्र स्पष्ट करून स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिभा व त्यांची असलेली जिद्द याविषयी मार्गदर्शन केले प्रा दीपक रिटे मार्गदर्शन करताना म्हणतात की देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी सशस्त्र क्रांती करण्याची शपथ घेतली आणि ती स्वातंत्र्यवीर सावरकरांनी शेवटपर्यंत पाळली तारुण्य संसार घरदार आयुष्य याची देशासाठी राख रांगोळी करणारा वीर सावरकर हा एक दृष्टा युगपुरुष होता इंग्रजी शासनाने काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावली असतानाही त्या कोठडीत ही त्यांनी आपली प्रतिभा जिवंत ठेवली आणि सहस्त्रावधी पानांचे वाङ्मय लिहिणारा युगपुरुष क्रांतिकारक म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर यांना ओळखले जाते स्वातंत्र्यवीर सावरकर उत्कट देशभक्त जहाल क्रांतिकारक एक इतिहासकार प्रभावी वक्ता क्रियाशील सुधारक होते वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांनी मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी शपथ घेतली तेव्हा अशा या युगपुरुष आला विनम्र अभिवादन यावेळी रोहित हेगडे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची सखोल माहिती सांगितल

Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner